# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक १०.०९.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०९.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ३० केसेसमध्ये ३० ईसमावर कारवाई करून एकुण ३३,०१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये ०४ इसमांवर कारवाई करून एकुण ४,७९,९६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२७० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ८,१५,२००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

दिनांक ०९.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १०.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— नायलॉन मांजा बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०९.२०२६ चे २०.३० वा. ते २२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अनैतिक मानवी व्यापार प्रतीबंधक पथक व सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना एकतानगर, शाहनवाज ले—आऊट, ग्रीन ग्लोब्ज्स कंपनीजवळ, उभ्या असलेल्या एका ई—रिक्षाजवळ व काळ्या रंगाचे मोपेड गाडीवरील ईसमांवर संशय आल्याने, त्यांचे जवळ जात असतांना, ते पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असतांना घेराव टाकुन ई—रिक्षा चालकास ताब्यात घेतले. मोपेड गाडीवरील ईसम गाडी सोडुन पळुन गेला. ई—रिक्षा चालकास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मोहम्मद शाहीद मोहम्मद सईद अन्सारी, वय २७ वर्षे, रा. शितलामाता मंदीर जवळ, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याचे ताब्यातील ई—रिक्षा मधील ०३ प्लॉस्टीक बोरीची पाहणी केली असता, त्यामध्ये शासनाने प्रतीबंधीत केलेला मोनोकाईट कंपनीच्या नायलॉन मांजाच्या एकुण १८० नग चक्री मिळुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन नायलॉन मांजा चक्री, ई—रिक्षा क्र. एमएच ४९ टिसी ०३२६, व ०१ मोबाईल फोन असा एकुण ६,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस मांजा बाबत विचारणा केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी फैजान अन्सारी, वय २९ वर्षे याचा असुन, त्याने ई—रिक्षात ठेवला होता व तो पोलीसांना पाहुन त्याची ॲक्सेस गाडी क्र. एमएच ४९ बिएक्स ६७०२ सोडुन पळुन गेल्याचे सांगीतले. घटनास्थळावरून त्याची मोपेड किंमती ७५,०००/—रू. ची जप्त करण्यात आली आहे. आरोपींचे कृत्य हे कलम २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम—१९८६ अन्वये होत असल्याने आरोपींविरूध्द पोलीस ठाणे

यशोधरानगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी नन्नावरे, सफौ. दिपक बिंदाणे, पोहवा. सचिन श्रीराम, राम निरगुडवार, अनिल वाकडे, नारायण पारवेकर, पोअं. नितीन वासने, कुणाल बोडखे व मपोअं. अश्वीनी खोडपेवार यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचे गुन्ह्यातील पाहीजे आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक १७.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, प्लॉट नं. ८१, विघ्नहर्ता को—ऑप. सोसायटी, एनएमसी. गार्डन जवळ, नागपुर येथे राहणारे फिर्यादी अनिल व्यंकटराव मुजगेवार, वय ६८ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, पुणे येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी कपाटातुन सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण ५७,२२५/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा पोलीसांनी यापुर्वी दोन आरोपींना अटक केली होती. दिनांक ०९.०९.२०२६ चे १६.३५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांनी मिळालेल्या माहीतीवरून गुन्ह्यातील पाहीजे आरोपी दयाशंकर उर्फ सागर संतोष बघेल, वय २५ वर्षे, रा. ब्लॉक नं. ४७, म्हाडा क्वॉर्टर, कपीलनगर, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चांदीचे वेगवेगळे दागिणे व वस्तु एकुण किंमती १६,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>४) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— चोरीच्या वाहनांचे सुटे भाग करून विक्री करीता ट्रकमध्ये नेणाऱ्या आरोपींना अटक. ३० लाखाचा मुद्देमाल जप्त.</u>**

दिनांक ०९.०९.२०२६ रोजी, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत केजीएन स्पेअर पार्ट्स, पद्मा नगर रोड, कपीलनगर येथुन चोरीचे मोटारसायकल व ईतर वाहनांचे सुटे भाग करून, ट्रकमध्ये भरून मध्य प्रदेश येथे विक्रीकरीता पाठविले जाणार आहेत. अशा खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचुन, ट्रक क्र. एमएच ४० बिजी ४९३७ हा दुकानासमारे उभा दिसल्याने पंचासमक्ष ट्रकची पाहणी केली असता, त्यामध्ये वाहनांचे वेगवेगळे सुटे भाग दिसुन आले. ट्रकसोबत हजर असलेले ईसमांना त्यांची नाव पत्ते विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) मोहम्मद वलीजान अब्दुल मयान, वय ३४ वर्षे, २) मोहम्मद साबीर अब्दुल मन्नन, वय ३४ वर्षे, दोन्हीही रा. प्लॉट नं. ३४५, संघर्ष नगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्यांना मालाचे कागदपत्राविषयी विचारणा केली असता, कोणतेही कागदपत्रे नसुन, कोणतेही समाधानकारक उत्तरे दिली नाही. नमुद मुद्देमाल हा चोरीचा असुन तो विक्री करीता नेत असल्याचे खात्री झालेवरून दोन्ही आरोपींचे ताब्यातुन वाहनांचे वेगवेगळे सुटे, डिव्हीआर व ट्रक असा एकुण ३०,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे कलम १२४ मपोका., सहकलम ३३(क्ष), १३१ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन व त्यांचे वाहनचोरी विरोधी पथकाने केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे एमआयडीसी :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०७.०९.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक ०९.०९.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत वडसकर ले–आऊट, शिवशंकर ले–आऊट, जयताळा, योगेश इंगळेचे घरी किरायाने राहणाऱ्या फिर्यादी सौ. किरण प्रशांत हिंगाणे, वय २९ वर्षे ह्या मध्यप्रदेश येथील गावी व त्यांचे पती आपले राहते घराला कुलुप लावुन मुंबई येथे गेले असता, शेजारी राहणारे यांनी फिर्यादीस त्यांचे घरी चोरी झाल्याचे कळविले. फिर्यादी यांनी घरी येवुन तपासणी केली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील कपाटात ठेवलेले रोख ३,००,०००/–रू. चोरून नेल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. शिवाजी बोरकर ८३२९१३०४५८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे हिंगणा</u> :–** दिनांक ०९.०९.२०२६ चे १४.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत नागपुर–जबलपुर हायवे, सत्यम ढाब्याचे मागे, सोडापार शिवारातील नाल्याचे पाण्यात एक ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह मिळून आला. प्रेत पाण्याबाहेर काढुन पोलीसांनी उत्तरीय तपासणी करीता एम्स हॉस्पीटल येथे पाठविले आहे. मृतकाची ओळख पटविली असता, तो फिर्यादी राजेंद्र तुंडीलाल भुरे, वय ३५ वर्षे, रा. बालाघाट (मध्यप्रदेश) ह.मु.– मेडीकल कॉलोनी, संदेश सिटी, जामठा यांचे बांधकाम साईडवरील लेबर नामे शंकर रामकुमार गुज्जर, वय ३५ वर्षे, रा. खानपुर, जि. जलाबाद (राज्यस्थान) हा असल्याचे सांगीतले. व तो दारू पिण्याचे सवयीचा असुन, तो दारूचे नशेत नाल्याचे पाण्यात पडुन मृत झाला असावा, असे फिर्यादी यांनी सांगीतले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे सफौ. धाकडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**स्वा/–**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**